

मा. ॲड.दिग्विजय कुराडे
उपाध्यक्ष, शिवराज विद्या संकुल



मा.डॉ.अनिल कुराडे
सचिव, शिवराज विद्या संकुल

।।सेवा परमो धर्मः।।



डॉ.एस.एम.कदम
प्राचार्य



मा.प्रा.किसनराव कुराडे
संस्थापक, शिवराज विद्या संकुल

ACCREDITED WITH GRADE A NAAC

## शिवराज विद्या संकुलाचे

# संभाजीराव माने

## साहित्य, वाणिज्य आणि विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय

### गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.



# 2024-25

# प्रेरणास्थान




## कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे

Birth : 23rd April 1863 Death : 2nd January 1944

# आधारवड

कोणतीही लढाई जिंकण्यासाठी,
प्रथम स्वत:शी लढायला शिक
स्वत:मध्ये दडलेल्या षड्रिपूंना,
हुडकून काढून प्रथम जिंक !
मग तुला कळून येईल,
तू जग जिंकले आहे.
अपयश सर्व तुझ्या समोर,
यश बनून झुकले आहे !



## प्रा. किसनरावजी कुराडे

**अध्यक्ष, क.वि.रा.शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लज**

# अखंड प्रेरणेचा उर्जास्त्रोत



# डॉ. प्रा. अनिलरावजी कुराडे

## सचिव, क.वि.रा.शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लज

शिवराज विद्या संकुल या भागातील एक शिखर संस्था व मातृसंस्था आहे. या भागाचे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक राजकीय अशा सर्वच क्षेत्रात नेतृत्व करणारी सध्याची पिढी घडविण्याचे भाग्य आमच्या संकुलाला जाते. त्याचबरोबर गडहिंग्लज, आजरा, चंदगड, भुदरगड, कर्नाटक व गोवा या सिमाभागातील ग्रामीण व बहुजन विद्यार्थ्यांच्या राहण्याच्या आणि खाण्याच्या खर्चामध्ये सर्वोत्तम असे पारंपारिक व व्यावसायिक शिक्षण घेऊन सक्षम कसा होईल यासाठी आम्ही नेहमी प्रयत्नशील आहोत.


ग्रामीण शिक्षण क्षेत्रात विस्मयकारक बदल घडवुन त्यातून ग्रामिण व बहुजन विद्यार्थी जागतिक स्पर्धेत कसा टिकला जाईल याकडे आमचे लक्ष लागलेले आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील काही नामवंत कॅम्पसपैकी पहिल्या पाच मध्ये आमच्या कॉम्प्युटर लॅबचा समावेश होतो याचा फायदा आज ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना होत आहे.

आमच्या ग्रामीण विद्यार्थ्यांच्या क्षमता जोपासण्यावर आमचा विश्वास असून त्यांना त्यांच्या क्षेत्रातील नवोत्तम घडामोडिंची माहिती देऊन विद्यार्थी सक्षम व दर्जेदार असे नव्या व आधुनिक जगाला सामोरे जाण्यासाठी कसे तत्पर होतील याकर आमचा भर आहे. उच्च शिक्षणाचे पायाभूत शिक्षण म्हणून ११ वी व १२ वी या दोन वर्षांकडे पाहिले जाते. त्यामध्ये त्याला त्याच्या क्षमतेची जाणिव होऊन नवनविन प्रणाली उपयोगात आणून आमचा विद्यार्थी हा उच्च शिक्षणासाठी तयार व्हावा ही आमची भूमिका आहे. यासाठी नविन अभ्यासक्रम, नवनविन अध्यापणाचे मार्ग, प्राध्यापक प्रशिक्षण आणि सर्वोत्तम तंत्रज्ञान सादर करून शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडवून आणण्याचे ध्येय आम्ही ठेवले आहे. त्यासाठी उच्चविद्याभुषित शिक्षक वृंद व भौतिक सुविधा देण्यासाठी आमची धडपड असते. यामुळे आमचे कॅम्पस 'ग्रीन ॲन्ड क्लीन' व 'माझी वसुंधरा' पुरस्काराचे मानकरी ठरले आहे.

त्याचबरोबर क्रिडा क्षेत्रामध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर आमचे विद्यार्थी पोहोचले असून सलग १३ वेळा जनरल चॅम्पीयनशिप आमच्या महाविद्यालयास प्राप्त झाली आहे. माझे वडिल बंधू व संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसनरावजी कुराडे यांनी हाती घेतलेले बहुजन विद्यार्थ्यांचे शिक्षणाचे व्रत आम्ही चांगल्या पध्दतीने पुढे घेऊन जात आहोत.

धन्यवाद ! जय शिवराय !

# कुशल प्रशासक



## डॉ. एस. एम. कदम

### प्राचार्य, संभाजीराव माने ज्यु. कॉलेज, गडहिंग्लज

शिवराज विद्या संकुल या भागातील शैक्षणिक क्षेत्रातील मैलाचा दगड (Mile Stone) आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आम्ही नेहमी तयार असतो. आमच्या कनिष्ठ महाविद्यालयाने आर्ट्स, कॉमर्स, सायन्स अशा तिन्ही पातळीवर गुणवत्तेच्या बाबतीत आपला उच्चस्तर कायम ठेवला आहे. अभ्यासक्रमाबरोबरच आमच्या कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धांमध्ये यशस्वी ठरले आहेत.

महाविद्यालयीन जीवनातील ११वी १२ वी ही दोन वर्षे म्हणजे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाचे पायाभरणी असते. त्यामुळे या वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढीबरोबरच मानवी मुल्ये आणि नैतिक मुल्यांची वृध्दी होणे महत्वाचे असते. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक व व्यावहारिक जीवनात प्रगतीच्या दृष्टीने आमचे महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील असते. विद्यार्थ्यांच्यामध्ये सचोटी, आदर, दया, प्रेम, करुणा इ. मुल्ये या वयामध्ये बिंबवल्यास सामाजिक स्वास्थ्य सुधारुन समाज बळकट होण्यास मदत होते. म्हणूनच विद्यार्थ्यांच्यामध्ये संविधानिक मुल्ये पेरण्याचे काम आम्ही करतो.

संस्था अध्यक्ष मा.प्रा.किसनराव कुराडे सर यांनी बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्थेची अहोरात्र कष्ट करुन ही संस्था वृध्दिंगत केली आहे. त्यांनी घालून दिलेल्या विचार कार्याचा वसा आणि वारसा जोपासत आम्ही वाटचाल करीत आहोत. या वाटचालीसाठी संस्थेचे सचिव डॉ. अनिलराव कुराडे नेहमची प्रोत्साहन आणि प्रेरणा देत असतात. त्या बळावरच आमच्या महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी केंद्रीत उपक्रम राबवित असतात. आमचा विद्यार्थी शिक्षण घेवून सक्षम व्हावा, नवनवीन आव्हाने पेलण्याचे ताकत निर्माण व्हावी व आकाशाला गवसणी घालणारे यश त्याने संपादन करावे यासाठी आमचे शैक्षणिक संकुल सातत्याने प्रयत्नशील असते. म्हणूनच महाविद्यालयाचे नाव जिल्हा नाहीतर राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर चमकत आहे. अशा आमच्या सर्व सोयींनियुक्त महाविद्यालयामध्ये आजच आपला प्रवेश निश्चित करा!



# प्रा. बीनादेवी अनिलराव कुराडे

## परीक्षा विभाग प्रमुख, संभाजीराव माने ज्यु. कॉलेज, गडहिंग्लज

### भूमिका

ग्रामीण विद्यार्थ्यांच्या मधील न्यूनगंड काढून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आमच्या समोरील सर्वात मोठे आव्हान होते. इंग्रजी विषयाचे अध्यापन करीत असताना विद्यार्थ्यांमधील न्यूनगंड हा त्यांच्या करिअर मधील अडथळा ठरताना दिसून आला. यासाठी आम्ही कला, वाणिज्य आणि विज्ञान अशा तिन्ही वर्गासाठी गरीब व होतकरू विद्यार्थ्यांची निवड करून करून स्वतंत्र स्कॉलर बॅचची सोय केली. यामध्ये वर्षभराच्या अभ्यासक्रमाचे नियोजन,शंका निरसन आणि सराव चाचणीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा भरपूर सराव करून घेतला जातो. जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढीस लागेल. या स्वतंत्र बॅचमध्ये विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना वैयक्तिक व योग्य मार्गदर्शन केले जाते.

यावर्षी परीक्षेमध्ये सुद्धा काही बदल करण्यात आले. बोर्डाच्या मॉडेल उत्तर पत्रिकेप्रमाणेच विद्यार्थ्यांच्या अनेक सराव परीक्षा घेण्यात आल्या त्यामुळे विद्यार्थ्यांच्या लेखनाचा सराव झाला आणि आत्मविश्वास वाढला. यावर्षीच्या बारावी बोर्ड निकालाचा विचार केला असता सरासरी गुणवत्ता ही तिन्ही शाखेची वाढलेली आहे. विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या या सराव परीक्षेचा फायदा झालेला दिसून येतो.

गरिब व होतकरू विद्यार्थीनींसाठी सौ. क्रांतीदेवी किसनराव कुराडे शिष्यवृत्तीच्या माध्यमातून दत्तक घेऊन त्यांना शिक्षणापासून वंचित न राहता शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे महत्वाचे काम आम्ही करीत आहोत.

एकूणच ग्रामीण व बहुजन विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवून स्पर्धेच्या जगात जाण्यासाठी सक्षम बनवणे हीच आमची यामागील निस्वार्थी भावना आहे.



# प्रा. तानाजी चौगुले

## पर्यवेक्षक, संभाजीराव माने ज्यु. कॉलेज, गडहिंग्लज

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे अंतिम ध्येय लक्षात घेऊन शारीरिक, बौध्दिक व मानसिक पातळीवरील विकास नजरेसमोर ठेवून आम्ही वाटचाल करीत आहोत. आजन्म मानवी जीवनांची अंतिम मुल्ये सेवेवर, त्यागावर व निष्ठेवर अवलंबून असतात. सेवा, त्याग व निष्ठा शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगी बिंबवली जावी यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

गेली ६० वर्षे या भागाचे शैक्षणिक नेतृत्व करणाऱ्या शिवराज विद्या संकुलातील संभाजीराव माने कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी आज राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकत आहेत. संस्था अध्यक्ष मा. किसनरावजी कुराडेकर यांनी पाहिलेले के.जी. टू पी.जी. शिक्षणाचे स्वप्न आज सत्यात उतरले आहे. त्याच बरोबर संस्था सचिव डॉ. अनिलरावजी कुराडे सर यांनी बदलत्या जगाची आव्हाने पेलणारा विद्यार्थी तयार व्हावा म्हणून अतिशय तळमळीने याला आकार दिला आहे. आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. कदम सर यांच्या नियोजनातून कनिष्ठ महाविद्यालयाची घोडदौड सुरु आहे. या ठिकाणी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांला चालना दिली जाते. या ठिकाणी असणारा विद्यार्थ्यांच्या वयोगट संवेदनशिल व संस्कारक्षम असा असतो. त्यामुळे शिक्षणाबरोबरच तो संस्कारशिल कसा होईल याकडे आम्ही लक्ष देत असतो.

कला शाखेतील विद्यार्थ्यांना स्पोर्टस अॅकॅडमी बरोबरच स्पर्धा परिक्षेच्या संदर्भातील बाळकडू दिले जाते. शिवाय पोलीस व आर्मी भरती प्रशिक्षणाची तयारी करुन घेतली जाते. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना **C.A., C.S.** यासारख्या परीक्षांच्या तयारी बरोबरच बँकींग क्षेत्रातील अनेक संधी उपलब्ध करुन दिल्या जातात. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी गएए, छएएड, उएइ इत्यादी परीक्षांची तयारी करुन घेतली जाते. स्वतंत्र स्कॉलर बॅचच्या माध्यमातून गरिब व होतकरू विद्यार्थ्यांना चालना दिली जाते.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी खेळाच्या माध्यमातून यशस्वी झाले आहेत. **NSS, NCC** च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती व देशसेवेची बीजे पेरली जातात. एकूणच या ठिकाणी शिकणारा विद्यार्थी हा सक्षम व भविष्याचा वेध घेणारा तयार व्हावा ही या पाठीमागची भूमिका आहे. तरी यावर्षी आपण आपला प्रवेश आपल्या महाविद्यालयामध्ये निश्चित करावा. धन्यवाद !



क. वि. रा. शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लज संचलित

# संभाजीराव माने ज्यु. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज.

आमचे ब्रीदवाक्य 'सेवा परमो धर्म'
सेवा हाच परम धर्म आहे.
'सेवा हाच सर्वोच्च धर्म आहे'

## दृष्टी

'विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देणे आणि त्यांना तर्क, विवेक, करुणा आणि परोपकाराच्या आधारे मजबूत भारत निर्माण करण्यासाठी तयार करणे.'

## मिशन

'गडहिंग्लज, आजरा, चंदगड, कागल, भुदरगड तहसील आणि महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा-कोकण सीमावर्ती भागातील विद्यार्थ्यांना नवीन प्रगत सामाजिक-आर्थिक ज्ञान आणि तंत्रज्ञानाने त्यांचे विचार बदलण्यासाठी दर्जेदार शिक्षण देणे हे आमचे ध्येय आहे.'

# ध्येय

१. ग्रामीण विद्यार्थ्यांना कला, वाणिज्य, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात व्यावसायिक शिक्षणाचा प्रसार करणे.

२. समाजाच्या उत्कर्षासाठी शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये संशोधन उपक्रमांना चालना देणे आणि प्रोत्साहन देणे.

३. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, शिष्टाचार आणि राष्ट्रीयत्व राखणे.

४. पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करणे.

# उद्दिष्टे

१. शिक्षणाच्या दर्जाविषयी जागरुकता निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात स्वाभिमान विकसित करणे.

२. ई-गव्हर्नन्सच्या वाढत्या गरजांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञान आणि ट्रेंडची ओळख करून देणे त्याचबरोबर त्यांना जागतिक स्तरावरील आव्हानांना तोंड देण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविणे.

३. संस्थेची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी विद्याशाखा विकास कार्यक्रम राबविणे.

४. नोकरीच्या बाजारपेठेच्या वाढत्या मागणीसाठी आमची उत्पादने तयार करण्यासाठी संगणक तंत्रज्ञानावर आधारित व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करणे.

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लजचे

# संभाजीराव माने साहित्य, वाणिज्य आणि विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, गडहिंग्लज.

## प्रास्ताविक

गडहिंग्लज, आजरा, चंदगड व भुदरगड तालुक्यांच्या शैक्षणिक विकासाचे उद्दिष्ट समोर ठेवून १९६४ पासून शिवराज महाविद्यालय व संभाजीराव माने कनिष्ठ महाविद्यालय कार्यरत आहे. विद्यार्थ्यांचा बौध्दिक, भावनिक व शारीरिक विकास साधत जीवनातील आव्हाने स्वीकारण्याचे बळ या महाविद्यालयाने दिले आहे. याचाच परिणाम म्हणजे विविध क्षेत्रात तळपणारा 'शिवराजीयन' होय.

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.प्रा.किसनराव कुराडे आणि संस्था सचिव डॉ. अनिलराव कुराडे यानी बदलत्या काळाचा विचार करून व आपल्या कल्पकतेने शिवराज महाविद्यालयाचे 'शिवराज विद्यासंकुल' बनविले आहे. आज या विद्यासंकुलात विविध विभाग कार्यरत आहेत. यातीलच एक महत्वाचा व पायाभूत विभाग म्हणजे आमचे संभाजीराव माने पदवीपूर्व (कनिष्ठ) महाविद्यालय होय.

आमचे संभाजीराव माने कनिष्ठ महाविद्यालय अनेक विभागात वैशिष्ट्यपूर्ण ओळख करून देत आले आहे. इथे येणाऱ्यास प्रवेशासाठी सर्व विभागांची दारे खुली आहेत. गडहिंग्लज व परिसरात इंग्रजी माध्यमाच्या शाळा काळाची गरज ओळखून विकसित होत आहेत. या माध्यमातून १० वी पास होणाऱ्या कला, वाणिज्य व विज्ञान शाखेकडे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड लक्षात घेऊन पूरेशी प्रवेशाची व्यवस्था केलेली आहे. यामध्ये इंग्रजी आर्टस्, कॉमर्स, सायन्सचे नव्याने मानरूता आणली आहे.

आमच्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना ११ वी व १२ वी बरोबरच विविध नवनवीन उपक्रम व कोर्सेस् या सारखे संधी उपलब्ध करून दिली जात आहे. त्याच बरोबर मुलींसाठी मोफत पासची सोय उपलब्ध आहे.

आमच्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना येथील सुसज्ज कॉम्प्युटर लॅब, इंटरनेट व तद्संबंधी इतर सुविधांचा लाभ मिळवून दिला जातो. त्या सोयीमुळे या शिवराज विद्यासंकुलातील अनेक विद्यार्थी देश-विदेशात सेवा बजावत आहेत.

येथे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सुमारे ८१,१८७ हजार ग्रंथ असलेल्या समृध्द ग्रंथालयाचा लाभ घेता येतो. एन्. सी. सी., एन्. एस्. एस्. (राष्ट्रीय सेवा योजना) तसेच शिवराज ॲकॅडमी (पोलीस व सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण) प्रशिक्षण विभागात प्रवेश घेता येतो, कमवा व शिका योजनेत सहभागी होऊन विद्याभ्यास करता येतो.

### ❋ प्रवेश प्रक्रिया ❋

या माहिती पत्रकासोबत दिलेला प्रवेश अर्ज महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला भरावा लागतो. १० वी उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्याला ११ वी आर्टस् , ११ वी कॉमर्स किंवा ११ वी सायन्स मध्ये प्रवेश मिळेल. ११ वी उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्याला १२ वी आर्टस् किंवा कॉमर्स किंवा १२ वी सायन्यमध्ये नियमाप्रमाणे प्रवेश मिळेल.

**❋ प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे**

१) प्रवेश अर्ज.

<u>२) प्रवेश अर्जामध्ये पूर्वीच्या शाळेचा U-DISE No. व Student ID No. लिहणे आवश्यक आहे.</u>

३) शाळा सोडल्याचा मूळ दाखला व त्याच्या दोन सत्य प्रती.

४) १०/११ वी उच्च माध्यमिक परीक्षेचे मूळ गुणपत्रक व दोन सत्य प्रती कागदपत्रे.
कागदपत्रे वेळेत देण्याची जबाबदारी सर्वस्वी संबंधित विद्यार्थ्यांवर राहील.

५) परराज्यातून दहावी पास होऊन ११ वीच्या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी वरील कागदपत्राव्यतिरिक्त मायग्रेशन बाबतची अन्य कागदपत्रे देणे आवश्यक आहे. त्याबाबत कार्यालयात कागदपत्रे व माहिती द्यावी.

६) फी सवलत अर्ज E.B.C./P.T.C./S.T.C./Ex.Ser. व मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी जातीचा दाखला व चालू आर्थिक वर्षाचा मा. तहसिलदाराचा एक लाखाच्या आतील उत्पन्नाचा दाखला पैकी १ अर्ज जमा करावा.

<u>७) आधार कार्ड सत्यप्रत – २ प्रतीत</u>

८) राष्ट्रीयकृत बँक पास बुक झेरॉक्स आवश्यक – २ प्रतित

**❋ अभ्यासक्रम :** दहा + दोन + तीन या नव्या शैक्षणिक आकृती बंधाप्रमाणे उच्च माध्यमिक शिक्षणाच्या दोन वर्षाच्या अभ्यासक्रमाचा समावेश ज्युनिअर कॉलेजमध्ये होतो. अकरावी व बारावीसाठी पुढील विषय घ्यावे लागतील.

| वर्ग | आवश्यक विषय (Compulsory Subject) | ऐच्छिक विषय (Optional Subject) |
|---|---|---|
| ११ वी, १२ वी साहित्य | १) इंग्रजी ०१<br>२) मराठी ०२<br>३) पर्यावरणशास्त्र ३१ | १) अर्थशास्त्र ४९<br>२) राज्यशास्त्र ४२ / हिंदी ०४<br>३) समाजशास्त्र ४५ |
| ११ वी वाणिज्य व<br>१२ वी वाणिज्य (संयुक्त)<br>(इंग्रजी व मराठी माध्यम) | १) इंग्रजी ०१<br>२) मराठी ०२<br>३) पर्यावरणशास्त्र ३१ | ४) मानसशास्त्र ४८<br>१) अर्थशास्त्र ४९<br>२) को-ऑपरेशन (सहकार) ५३ किंवा<br>सेक्रेटेरियल प्रॅक्टिस (चिटणीसाचा व्यवसाय) ५२<br>३) बुक किपिंग व अकौंटन्सी (पुस्तकपालन व लेखापरीक्षण) ५०<br>४) ऑर्गनायझेशन ऑफ कॉमर्स ५१ |
| ११ वी / १२ वी विज्ञान<br>(शिवराज ॲकेडमी) | १) इंग्रजी ०१<br>२) मराठी ०२/माहिती तंत्रज्ञान ९७<br>३) पर्यावरणशास्त्र ३१ | १) पदार्थ विज्ञान ५४<br>२) रसायनशास्त्र ५५<br>३) जीवशास्त्र ५६<br>४) गणित ४०<br>५) मानसशास्त्र ४८<br>} यापैकी कोणतेही दोन |

❋ ऐच्छिक विषयबाबत–कमीतकमी २० विद्यार्थी विषय घेत असतील तरच विषय शिकवला जाईल.

❋ सर्व विषयांचे प्रोजेक्ट इयत्ता अकरावी व बारावी विद्यार्थ्यांना आपपल्या विषयानुसार वेळेत देणे बंधनकारक राहील.

**❋ महत्वाची टीप :**

१) अनुदानीत व विनाअनुदानीत ११ व व १२ वीच्या विद्यार्थ्यांना नियमानुसार फी भरुन प्रवेश घ्यावा लागेल. (फीचा तक्ता नोटीसबोर्डवर प्रसिद्ध केला जाईल.)

२) वेळेवर फी न दिल्यास दंड करण्याचा किंवा शेवटी वार्षिक परीक्षेस बसू न देण्याचा अधिकार प्राचार्यांना आहे.

३) एकदा भरलेली फी कोणत्याही सबबीवर परत केली जाणार नाही.

४) कार्यालयात मूळ कागदपत्रे देण्यापूर्वी त्यांच्या ज्यादा झेरॉक्स प्रती काढून सत्यप्रत करुन घ्याव्यात. एकदा दिलेली कागदपत्रे परत दिली जाणार नाहीत.

५) विषयांचे कोड नंबर बोर्ड फॉर्म व प्रवेश फॉर्मवर लिहिणे बंधनकारक.

## उपस्थिती व टर्म

शैक्षणिक वर्ष दोन सत्रात विभागले आहे. प्रत्येक सत्रात विद्यार्थ्यांची उपस्थिती किमान ७५ टक्के अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांचे आवश्यक तेवढे दिवस भरले नाहीत तर त्याला परीक्षेस बसता येणार नाही.

प्रत्येक शैक्षणिक वर्षाची दोन सत्रे असतात. सत्राच्या पहिल्या दिवसापासून अध्यापनाचे काम चालू राहील. विद्यार्थ्यांनी सत्र सुरु होण्यापूर्वीच प्रवेश घेणे आवश्यक आहे.

* सन २०२४-२५ शैक्षणिक वर्ष पुढीलप्रमाणे राहील -

प्रथम सत्र : ---जून २०२४ ते --- ऑक्टोबर २०२४

द्वितीय सत्र : ---नोव्हेंबर २०२४ ते --- मे २०२५

* अध्ययन व अध्यापनाची भाषा-उच्च माध्यमिक वर्गाची भाषा मराठी व आवश्यकतेनुसार इंग्रजी राहील.

## प्राध्यापक वर्ग

वेगवेगळे विषय शिकविण्यासाठी संस्थेने या क्षेत्रातील अनुभवी व नावाजलेल्या तज्ज्ञ प्राध्यापकांची नियुक्ती केलेली आहे.

## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

शैक्षणिक अभ्यासक्रम व्यतिरिक्त स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी तज्ञ व अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन.

## ग्रंथालय विशेष

* ८१,१८७ हजार ग्रथांनी समृद्ध.
* ५० नियमित नियतकालिके.
* सकाळी ७.२० ते सायं. ६.०० पर्यंत पुस्तके देवघेव.
* परीक्षा कालावधीत अभ्यासिका सकाळी ७.०० ते रात्री १२.०० पर्यंत.
* गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना पुस्तक पेढीतून पुस्तक संच.
* ३०% रक्कम भरुन पुस्तक संच मिळण्याची सोय.
* दोन पुस्तके एका वेळी मिळण्याची सोय (एक क्रमिक, एक संदर्भ)
* स्पर्धा परीक्षेची ५००० पुस्तके
* स्पर्धा परीक्षा तयारीसाठी स्वतंत्र अभ्यासिकेची सोय.
* अभ्यासिकेमध्ये प्रश्नपत्रिका संच मिळेल. आवश्यक असल्यास उऊ अथवा झशपवीळींश मधूनही प्रश्नपत्रिका संच मिळेल.
* SLIM 21 या स्टँडर्ड सॉफ्टवेअरचा उपलब्ध.
* Keywards च्या माध्यमातून वाचनासहित्य शोधण्याची सोय.
* N-LIST च्या माध्यमातून 97000+e-books, व 6000+e-journals.
* पदव्युत्तर वर्गाच्या विद्यार्थ्यांना मुक्तद्वार प्रवेश.
* नव्या वाचकांसाठी Oriented Programme.
* संशोधन करणाऱ्या व्यक्तींना नेहमी खुले.
* विद्यार्थी, शिक्षक या व्यतिरिक्त समाजातील अन्य वाचकांना अनामत घेऊन पुस्तक देवघेव.
* कॉ. गोविंदराव पानसरे अध्यासन.

## शिस्त

विद्यार्थ्यांचा अभ्यास, उपस्थिती व त्याचे कॉलेजमधील व बाहेरील वर्तन याबाबत कॉलजने बनविलेले नियम सर्व विद्यार्थी-विद्यार्थीनींना बंधनकारक आहेत. या नियमांचा भंग करणारे शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहतील. महाविद्यालयाची शिस्त पाळणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थीनींनाच या महाविद्यालयात प्रवेश दिला जातो. याची विद्यार्थी व पालकांनी नोंद घ्यावी.

१) कॉलेजमधील सर्व विषयांचे तास, ट्युटोरिअल व शारीरिक शिक्षण, पी. ई. चे तासांना नियमितपणे हजर असणे हा कॉलेजच्या शिस्तीच्या एक भाग आहे.

२) विद्यार्थ्यांनी कॉलेजमध्ये घेतल्या जाणाऱ्या सर्व परीक्षांना हजर असले पाहिजे. त्यात चुकारपणा करणाऱ्या विद्यार्थ्यांना वार्षिक परिक्षेस बसू दिले जाणार नाही.

३) इ. ११ वी व १२ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी सर्व विषयांचे प्रोजेक्ट देणे बंधनकारक राहील.

३) विद्यार्थी दीर्घकाळ गैरहजर राहिल्यास त्याचे नांव कमी करणेत येईल.

४) कॉलेज प्रवेश घेतल्यानंतर ओळखपत्र (Identity Card) घ्यावे लागेल. हे ओळखपत्र प्रत्येकाने कॉलेजमध्ये असताना स्वत:जवळ ठेवलेच पाहिजे.

ओळखपत्राशिवाय कॉलेज आवार, ग्रंथालय, कार्यालय येथे वावरणे, लेक्चर्सना बसणे नियमबाह्य ठरेल. ओळखपत्र हरवल्यास लेखी अर्ज देऊन संबंधितांनी हरविल्याची कारणे पटवून देऊन रु. ५०/- भरुन नवीन कार्ड घ्यावे लागेल.

५) वर्ग चालू असताना कॉलेजच्या आवारात रेंगाळणे तसेच इतर वर्गाला त्रास होईल असे कोणत्याही प्रकारचे वर्तन करणे शिस्तभंग मानले जाईल.

६) कॉलेजच्या मालमत्तेची प्रत्येकाने काळजी घ्यावी, भिंती, दरवाजे, काचा, फळे, डेस्क, झाडे इत्यादिंची मोडतोड, खराबी क्षम्य ठरणार नाही.

७) प्राचार्यांच्या पूर्व संमती शिवाय कॉलेजमध्ये कोणतेही मंडळ स्थापन करता येणार नाही. अथवा कोणतेही कार्यक्रम घडवून आणता येणार नाहीत.

८) शिस्तीसंबंधी कोणत्याही बाबतीत प्राचार्यांनी दिलेला निर्णय अंतिम स्वरुपाचा राहील.

## फी सवलती व शिष्यवृत्ती

अ) ई. बी. सी. फी सवलत

ज्यांच्या आई-वडिलांचे उत्पन्न रुपये १,००,००० (एक लाख) हून कमी असेल त्यांना राज्य सरकारतर्फे पूर्ण फ्रिशीप दिली जाते. वेळेत अर्ज करण्याची व कागदपत्रे हजर करण्याची जबाबदारी ज्या त्या विद्यार्थ्यांची आहे. काही कारणास्तव जर ही फ्रिशीप सरकारकडून नामंजूर झाली तर त्या विद्यार्थ्याला अगर विद्यार्थिनीला फी ची संपूर्ण रक्कम कॉलेजमध्ये भरावी लागेल.

ब) रुपये १,००,००० पेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या काही होतकरु विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे आर्थिक सवलती दिल्या जातात. त्यासाठी प्राचार्यांशी संपर्क साधावा.

क) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी (SC, ST, NT) भारत सरकारकडून स्कॉलरशीप दिली जाते या संबंधीची माहिती कार्यालयातून घ्यावी.

ड) सौ. क्रांतीदेवी किसनरावजी कुराडे शिष्यवृत्ती गरीब व होतकरु विद्यार्थीनीच्यासाठी दिली जाते.

ड) इतर शिष्यवृत्त्या व सवलती बाबत वेळोवेळी मार्गदर्शन केले जाईल. त्या बाबत सविस्तर माहितीसाठी कार्यालयात भेटावे.

इ) मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी राष्ट्रीयकृत बँकेची पास बुक झेरॉक्स २ प्रती.

| गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना प्रवासासाठी आर्थिक सहाय्य दिले जाईल. |
| --- |

**जिमखाना**

सर्व प्रकारच्या देशी व विदेशी खेळांची येथे सोय करण्यात आली आहे. खेळाडूंना शास्त्रशुध्द शारीरिक व खेळाचे शिक्षण देण्यासाठी स्वतंत्र प्राध्यापकाची नियुक्ती केली आहे. कॉलेजच्या परिसरात कॉलेजचे प्रशस्त असे क्रीडांगण आहे.

वर्ग प्रतिनिधींची निवड वर्गात सर्वाधीक गुण असणाऱ्या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीचींच होईल. या बाबतीतील सर्व अधिकार प्राचार्यांकडे राहतील.

ऊपालक शिक्षक संघ

भौतिक, शैक्षणिक व विद्यार्थी विकासाच्या संदर्भातील समस्या सोडविण्यासाठी व शालेय कामकाजामध्ये पालकांचा सक्रिय सहभाग व सहयोग वाढविण्यासाठी शासनाने शिक्षण संस्थामध्ये पालक शिक्षक संघ स्थापन करण्याचे ठरविल्यानुसार तशाप्रकारे आमच्या ज्युनिअर कॉलेजमध्ये संघ स्थापन केला जातो. त्यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांचा पालक हा सभासद राहील. त्यातून शासनाच्या धोरणानुसार कार्यकारी समितीची रचना राहील.

**पालक शिक्षक संघाची थोडक्यात कार्ये**

१) नियोजनाप्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण होईल ते पाहणे.

२) अभ्यासात कमकुवत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी योग्य त्या उपाययोजना सुचविणे.

३) अभ्यासाशी पुरक असलेल्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यास शाळांना सहाय्य करणे.

४) सहशालेय उपक्रमांना मान्यता देणे.

तरी या बाबत वेळोवेळी सविस्तर माहिती बोर्डवर लावली जाईल किंवा कळविली जाईल. तरी पालकांनी यात सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी सहकार्य करावे.

**पालकांना सूचना**

विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची वेळेवर पूर्तता, गैरहजेरी, बेशिस्त, फी देण्यासंबंधी अनियमितपणा अशा गोष्टीसंबंधी प्राचार्यांनी पालकांना कळविल्यास योग्य ते सहकार्य देणे हे पालकांचे कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांस अभ्यासाबाबत अथवा कामासंबंधी अडचणी आल्यास पालकांनी खुल्या मनाने प्राचार्यांची भेट घेणे किंवा त्यांना लिहिणे स्वागतार्ह ठरेल.

१२ वी विद्यार्थ्यांसाठी संपूर्ण वैयक्तिक माहिती असलेली फाईल ठेवणेत येईल. त्याची अभ्यासातील प्रगती, महाविद्यालयातील वर्तन, कार्यक्रमातील सहभाग, परीक्षेतील गुण यांची त्यात नोंद ठेवली जाईल.

प्राचार्य

संभाजीराव माने कनिष्ठ महाविद्यालय, गडहिंग्लज.

# सन २०२४-२०२५ वर्षातील संभाव्य परिक्षा कालावधी

| अ.क्र | परिक्षा | एकूण गुण | इयत्ता १२ वी | इयत्ता ११ वी |
|---|---|---|---|---|
| १ | घटक चाचणी क्र. १ | २५ | १९/८/२०२४ | १९/८/२०२४ |
| २ | सहामाही परीक्षा | ५० | २१/१०/२०२४ | २१/१०/२०२४ |
| ३ | घटक चाचणी क्र. २ | २५ | १६/१२/२०२४ | १६/१२/२०२४ |
| ४ | सराव परीक्षा क्र. १ | ८० | १/१/२०२५ | ---- |
| ५ | सराव परीक्षा क्र. २ | ८० | १३/१/२०२५ | ---- |
| ६ | पुर्व परीक्षा | ८० | २०/१/२०२५ | ---- |
| ७ | बोर्ड परीक्षा | ८० +(अंतर्गत मुल्यमापन २०) | १८/२/२०२५ | ---- |
| ८ | वार्षिक परीक्षा | ८० +(अंतर्गत मुल्यमापन २०) | ---- | १७/३/२०२५ |

## प्राध्यापक वृंद

**☐ मराठी विभाग**

प्रा. टी. व्ही. चौगुले (एम.ए.बी.एड. एम.एज्युकेशन)

प्रा. सौ.जी. आय. देसाई (एम. ए., बी.एड.)

**☐ हिंदी विभाग**

प्रा. सौ. एल. एम. डिसोझा (एम. ए., बी.एड.)

**☐ समाजशास्त्र विभाग**

प्रा. एस. पी. पाटील
एम.ए.,बी.एड.,डी.एस.एम,जीडीसी ॲण्ड ए

**☐ अर्थशास्त्र विभाग**

प्रा. टी. डी. भोंदुगरे (एम.ए., बी.एड.)

प्रा. एल. ए. कांबळे (एम.ए., बी.एड.एम.एड.)

**☐ मानसशास्त्र विभाग**

प्रा. एम. एल. घस्ती (एम.ए., बी.एड.)

प्रा.सौ.डी.ए. कुलकर्णी (एम.ए., बी.एड.)

**☐ राज्यशास्त्र विभाग**

प्रा. स्वप्निल स. आर्डाळकर
(एम.ए., बी.लिब,बी.एड.,ओरीसा)

**☐ पर्यावरणशास्त्र विभाग**

प्रा सौ. एस. पी. माझुली (एम. एस्सी.बी.एड.)

**☐ वाणिज्य विभाग**

प्रा. सौ. ए. व्ही. पाटील (एम.कॉम., बी.एड.)

प्रा. सौ. एस. एन. जांभगुरे (एम.कॉम., एम.एड.)

**☐ आय. टी. विभाग**

प्रा.एस. पी. कुराडे (एम.एस्सी. कॉम्प्युटर)

प्रा. एल. एन. नाईक (एम.एस्सी. कॉम्प्युटर)

प्रा. ए. एम. काळे (एम.एस्सी. कॉम्प्युटर)

**☐ शारीरिक शिक्षण विभाग**

प्रा. जे. एम. पाटील (एम.ए., एम.पी.एड.)

**☐ गणित विभाग**

प्रा. के. व्ही. कदम (एम.एस्सी., बी.एड.)

प्रा. आर. डी. कांबळे (एम.एस्सी., बी.एड.)

प्रा. एल. एल. यादव (एम.एस्सी., बी.एड.)

प्रा. आर. डी. भिसाळ (एम.एस्सी., बी.एड.)

**☐ इंग्रजी विभाग**

प्रा . सौ . बी . ए . कुराडे (एम.ए., बी.एड.)

प्रा. सौ. पी. बी. जाधव (एम. ए., बी.एड.)

प्रा. सौ. ए. ए. जोशी (एम.ए., बी.एड.)

**☐ पदार्थ विज्ञान विभाग**

प्रा. ए. बी. कोळेकर (एम.एस्सी., बी.एड.)

प्रा. आर. टी. पाटील (एम.एस्सी., बी.एड.)

प्रा. एल. आर. भादवणकर (एम.एस्सी., बी.एड.)

प्रा. अश्विनी तेलंग (एम.एस्सी., बी.एड.)

प्रा. एल. एम. रणदिव (एम.एस्सी., बी.एड.)

प्रा. व्ही. बी. श्रेष्ठी (एम.एस्सी., बी.एड.)

प्रा. ए. एम. सरनोबत (एम.एस्सी., बी.एड.)

**☐ जीवशास्त्र विभाग**

प्रा. व्ही. वाय. पाटील (एम.एस्सी., बी.एड.)

प्रा. जे. बी. दोरुगडे (एम.एस्सी., बी.एड.)

प्रा. जी. एस. कैजाणू (एम.एस्सी., बी.एड.)

प्रा. एस.जे.पाटील (एम.एस्सी., बी.एड.)

प्रा. एस.एम. देसाई (एम.एस्सी., बी.एड.)

प्रा. आय. एफ. आगा (एम.एस्सी., बी.एड.)

प्रा. बी. आर. बेलेकर (एम.एस्सी., बी.एड.)

**☐ रसायनशास्त्र विभाग**

प्रा. सौ. एस. ए. पाटील (एम. एस्सी., बी.एड.)

प्रा. सौ. एस. एल. कांबळे (एम. एस्सी. बी.एड.)

प्रा. आर. के. आवटे (एम. एस्सी., बी.एड.)

प्रा. एस. एम. पाटील (एम. एस्सी., बी.एड.)

प्रा. के. एस. वेदपाठक (एम. एस्सी., बी.एड.)

प्रा. एल. के. सोनटक्के (एम. एस्सी., बी.एड.)

# करियरच्या दिशा

### ११ वी १२ वी आर्टस् विद्यार्थ्यांसाठी

## विविध पदांसाठी सुवर्णसंधी

- कृषिअधिकारी, वनअधिकारी,
- पोलीस आर्मी
- ग्राफिक डिझायनर फॅशन डिझायनर
- विक्रीकर निरीक्षक अधिक्षक
- शिक्षक शिक्षणाधिकारी प्राध्यापक
- कर सहायक
- बँकीग
- सुत्रसंचालक आरोग्य सेवक
- वकील, न्यायाधिश
- तहसिलदार जिल्हाधिकारी प्रांताधिकारी
- डी.वाय.एस.पी. आय.पी.एस. पी.एस.आय
- लेखक, कवी, वक्ता,
- आपण काय निवडाल??
- भाषांतरकार, टंकलेखन प्रबोधनकार
- तलाठी, बी.डी.ओ., ग्रामसेवक,
- उद्योजक, हॉटेल मॅनेजमेन्ट,
- पत्रकार
- अभिनेता, खेळाडू
- उत्तम नागरीक, मंत्रालयीन समाजसेवक,

**आमचं ठरलय कला (आर्टस्)**
**शाखेत प्रवेश घ्यायचं आणि**
**अधिकारी व्हायचं...**

**१००%**
**निकालाची परंपरा**

## आर्टस्‌मधील करीअर संधीची क्षेत्रे

१) U.P.S.C. स्पर्धा परीक्षा
२) M.P.S.C. स्पर्धा परीक्षा
३) पत्रकारिता
४) आरोग्य सेविका
५) फॅशन डिझायनींग
७) अनुवादक व भाषांतर
७) टंकलेखक / स्टेनो
८) एम. एस. डब्लु (M.S.W.)
९) प्रशासकिय क्षेत्रातील अधिकारी
१०) कायदेविषयक मार्गदर्शक
११) बँकिंग
१२) शिक्षण क्षेत्रातील विविध पदे
१३) कृषी क्षेत्रातील विविध पदे
१४) पोलीस/ क्राईम ब्रँच
१५) आर्मी
१६) सुत्रसंचालक/निवेदक
१७) अभिनय व कला क्षेत्र
१८) हॉटेल मॅनेजमेन्ट
१९) टूरिझम
२०) राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू
२१) व्यक्तिमत्व विकास/ समुपदेशक
२२) स्पोकन इंग्लीश
२३) अंगणवाडी शिक्षिका


प्रा. पी. डी. पाटील
(कला, कौशल्य व संभाषण विषयक मार्गदर्शक)


डॉ. फारुख डगरी
(STI) - Career in Competitive Exam
(स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक)


अभय पाटील
(स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक)


डॉ. समिधा चौगुले
एम.डी. (आयु.)
(मुलींच्यासाठी आरोग्यविषयक मार्गदर्शक)


डॉ. पद्मजा मावडे

क्रिडा विभाग प्रमुख

ज्युनियर कॉलेज विभाग प्रमुख


प्रा. राहूल मगदूम
(सिनीयर विभाग)


प्रा. जयवंत पाटील
(ज्युनियर विभाग)



प्रा. तानाजी चौगुले
एम.ए.,बी.एड.



**Contact : (02327) 222307**
**99096625095, 9421205366, 9822188532**

टिप - संभाजीराव माने ज्युनि. कॉलेज गड. मध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिवराज महाविद्यालयामध्ये (सिनीयर) प्रवेशासाठी ८०% जागा राखीव

# करियरच्या दिशा



११ वी व १२ वी कॉमर्स
(मराठी माध्यम)
Result 100%
यशस्वी शिक्षणाचा झरा...
कॉमर्स विदया शाखा हाच मार्ग खरा...
टिप - संभाजीराव माने ज्युनि. कॉलेज मा. मध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना
शिवराज महाविद्यालयामध्ये (सिनीयर) प्रवेशासाठी ८०% जागा राखीव

चालू
वर्षाचे
उपक्रम...



**बँकिंग क्षेत्रातील स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन**

- प्रा. अभिजीत पाटील



**CA, Company Secretory मार्गदर्शक**

- डॉ. महेश चौगुले



**स्पर्धा परीक्षा आणि मी**

- प्रा. अभय पाटील





**मुलींच्यासाठी आरोग्यविषयक मार्गदर्शक**

- डॉ. वर्षा पाटोळे

## CA फाउंडेशन परीक्षा उत्तीर्ण


आपल्या महाविद्यालयातील बी. कॉम. -१ (इंग्रजी माध्यम) मधील
Company Secretary Executive Entrances Test (CSEET) उत्तीर्ण



निखिल जोशी


ओमकार पवार


शिवानी कुरणे


आयुषीका मेस्त्री



प्रतिमा बारटक्के



वैष्णवी कांबळे



गौरी घुगरी


CA Inter उत्तीर्ण


विभावरी शेख



मर्सेलीना कार्डोस्कर


साक्षी देसाई


साक्षी कुलकर्णी


सिध्दी मायदेव


ऋतुजा देसाई


भालचंद्र पोवार

## उत्तीर्ण झालेबद्दल हार्दिक अभिनंदन

**कॉमर्समधील करिअरच्या संधी**

ज्युनियर कॉलेज विभाग प्रमुख


प्रा. मल्हारी चौगुले
एम.ए.बी.एड.

- Chartered Accountant
- Accountant
- Finance Controller
- Accountant Executive
- Company Secretary
- Finance Analyst
- Financial Controller
- Finance Manager
- Finance Consultant
- Investment Analyst
- Stock Broker
- Portfolio Manager
- Tax Ident
- Tax Auditor
- Credit Manager
- Junior Accountant
- Book Keeper
- Internet Marketing
- Executive - Ecommerce
- Corporate Lawyer

- बँकिंग स्पर्धा परिक्षा
- शेअर मार्केटिंग
- हॉटेल मॅनेजमेंट
- मार्केटिंग व जाहिरात
- Ph.D
- M.Phil
- L.L.B.
- B.C.A.
- B.B.A.
- M.Com
- B.Com
- MPSC
- UPSC
- Army
- पोलीस

Contact : (02327) 222307
9822188532, 8888333831,
9421231636, 9860705038

# ११ वी व १२ वी सायन्स विद्यार्थ्यांसाठी
# करिअरच्या सुवर्णसंधी

## ११ वी, १२ वी विज्ञान

**Result 100 %**

**वैशिष्ट्ये :-**

- हमखास यशाची खात्री
- अनुभवी कौशल्य प्राप्त व तज्ञ प्राध्यापक
- सुसज्ज प्रयोगशाळा
- स्पर्धा परिक्षांची तयारी करण्यासाठी संदर्भ पुस्तके (Reference Books) असणारे ग्रंथालय
- अभ्यास सहलींचे नियोजन
- भरपूर सराव व उजळणी
- परिपूर्ण नोट्स्
- घटकनिहाय परिक्षा
- CET, JEE, NEET, परिक्षांची तयारी
- पालक मेळाव्यांचे नियोजन
- प्रशस्त क्रीडांगण
- प्रशस्त व सुसज्ज जिमखाना
- भव्य व प्रशस्त इमारत

टीप : संभाजीराव माने ज्युनि. कॉलेज गड. मध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिवराज महाविद्यालयामध्ये (सिनीयर) प्रवेशासाठी ८०% जागा राखीव.

## Special Guidance for
## NEET | IIT-JEE | MHT-CET | NDA



## करियरच्या विशेष संधी

- Engineering
- NDA
- MBBS
- BDS
- BAMS
- BHMS
- DMLT
- B.Sc. BBA, BCA, BCS
- Pharmacy
- Veterinary (B.V.Sc)
- Optometery
- Public Health Admin.
- Occupational Therapy
- Physiotherapy
- Clinical Research
- Radiology
- Biotechnology
- Bio Informatics
- B.Sc. Agriculture









**Contact : (02327) 222307**

**Mobile : 8275449879, 9923076764**

# विविध विभागाचे अंतरंग(छायाचित्रे)



काव्यकट्टा



युपीएससी मधील यश संपादन



युवा संवाद



युपीएससी मधील यश संपादन



एक दिवशीय कार्यशाळा



पालक विद्यार्थी संवाद सभा



पालक विद्यार्थी संवाद सभा

# क्रीडा विभाग

नॅशनल चॅम्पियनशिप
मानकरी












मलखांब -
विभागीयस्तरीय निवड







# क्रीडा विभाग













नॅशनल चॅम्पियनशिप
मानकरी

# राष्ट्रीय सेवा योजना

# NSS

"Not Me, But You"





# वार्षिक स्नेहसंमेलन











# शिवराज

तलवारबाजी
कब्बडी
ॲथलेटिक्स
स्विमिंग
बॉक्सींग
फुटबॉल
सांस्कृतिक
कुस्ती
क्रिकेट
ग्रंथालय
योगासन
स्केटींग
डॉजबॉल
शरीर सौष्ठव
खो. खो.
जिम